# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ,
# पुणे विभागीय मंडळ , पुणे – ४११००५

Maharashtra State Board Of Secondary & Higher Secondary Education,Pune Divisional Board , Pune - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-mail sscboardpune@gmail.com
Website : www.sscboardpune.in


क्रमांक.पुविमं/डीपी/2095
पुणे ४११००५
दिनांक :-२१/१२/२०१६

प्रति,
मुख्याध्यापक /प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त शाळा/महाविद्यालय,
पुणे ,अहमदनगर, सोलापूर.

विषय – फ्रेब्रु – मार्च २०१७ मध्ये होणा–या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ . १२ वी ) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र(इ . १० वी ) परीक्षेबाबत .
संदर्भ – क्रमांक रांम/ परीक्षा –२/८६७७ . दि – २२.१२.१०१६

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, फ्रेब्रु – मार्च २०१७ मध्ये होणा–या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ . १२ वी ) परीक्षेसाठी मल्याळम व बंगाली या विषयांची पाठयपुस्तके सन २०१६–२०१७ पासून बदललेली आहेत . त्यामुळे सदर परीक्षेस प्रविष्ठ होणा–या नियमित विदयार्थ्यांना नविन पाठयपुस्तकानुसार प्रश्नपत्रिका देण्यात येतील व पुनर्परीक्षार्थी विदयार्थ्यांना जुन्या पाठयपुस्तकानुसार प्रश्नपत्रिका देण्यात येतील. तसेच पुनर्परीक्षार्थी विदयार्थ्यांना जुन्या पाठयपुस्तकानुसार परिक्षेस प्रविष्ठ होण्यासाठी फ्रेब्रु – मार्च २०१७ व जुलै– ऑगस्ट २०१७ अशा दोन संधी राहतील .

मार्च २०१७ मध्ये होणा–या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ . १० वी ) परीक्षेपासून खालील नमूद १ ते ८ भाषा विषयांच्या प्रश्नपत्रिका कृतिपत्रिकेवर आधारीत असतील .

१. मराठी प्रथम, व्दितीय / तृतीय व संयुक्त
२. हिंदी प्रथम, व्दितीय / तृतीय व संयुक्त
३. उर्दू प्रथम, व्दितीय / तृतीय व संयुक्त
४. गुजराती प्रथम, व्दितीय / तृतीय व संयुक्त
५. कन्नड प्रथम, व्दितीय / तृतीय व संयुक्त
६. तेलगु प्रथम, व्दितीय / तृतीय व संयुक्त
७. सिंधी प्रथम, व्दितीय / तृतीय व संयुक्त
८. संस्कृत व्दितीय / तृतीय व संयुक्त

उपरोक्त १ ते ८ भाषा विषयासांठी प्रविष्ठ होणा–या पुनर्परीक्षार्थी विदयार्थ्यांनासुध्दा कृतिपत्रिकेवर आधारीत प्रश्नपत्रिका देण्यात येणार आहेत .

तसेच खालील नमूद भाषा विषयांची पुस्तके बदललेली असल्याने पुनर्परीक्षार्थी विदयार्थ्यांना जुन्या पाठयपुस्तकानुसार व नियमित विदयार्थ्यांना नविन पाठयपुस्तकानुसार प्रश्नपत्रिका देण्यात येतील.पुनर्परीक्षार्थी विदयार्थ्यांना जुन्या पाठयपुस्तकानुसार परिक्षेस प्रविष्ठ होण्यासाठी मार्च २०१७ व जुलै– ऑगस्ट २०१७ अशा दोन संधी राहतील याची नोंद घ्यावी.

१. तमिळ प्रथम, व्दितीय / तृतीय व संयुक्त
२.मल्याळम प्रथम, व्दितीय / तृतीय व संयुक्त
३. कन्नड संयुक्त
४. तेलगु संयुक्त

उपरोक्त तपशिलानुसार माहिती आपल्या सर्व विदयार्थी , शिक्षक व संबंधित सर्वांच्या निदर्शनास आणून देऊन दर्शनीभागावर नोटिस बोर्डावर लावावी.

5/1/2017
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ
पुणे ४११००५

प्रत–
मा.सचिव
राज्य मंडळ,
पुणे–४